MHAU110010962017

## <u>नियमित दिवाणी मुकदमा क्र.१०४ सन २०१७</u>
## <u>निशाणी ३४ वरील आदेश</u>

अर्ज व म्हणणे वाचुन पाहिले. प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे लेखी जबाबामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जातील प्रतिवादीचे थोडक्यात कथन असे की, वादीने मौजे हिवरा, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद येथील गट नं.४५ मधील ७ एकर ३ गुंठे शेतजमीनीच्या वाटणीसाठीचा दावा दाखल केला आहे. त्यावर प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र.१६ वर दाखल केले आहे. त्या लेखी जबाबात दावा जमीन ही प्रतिवादी क्र.१ रामजी यांची स्वयंसंपादित आहे असे नमुद केले आहे व परिच्छेद क्र.४ मधील लाईन नं.३ मध्ये सदरील दावा जमीन ही वादी क्र.१ ची स्वयंसपादीत असुन त्याने प्रतिवादी क्र.२ व ३ या त्याचे मुलांचे नावे त्याचे इच्छेने केली आहे असे चुकीने नमुद झालेले असुन ती दावा जमीन ही प्रतिवादी क्र.१ याची स्वयंसंपादीत आहे असे नमुद झाले पाहिजे होते. प्रतिवादीकडुन अनावधानाने लेखी जबाबातील परिच्छेद नं.४ मध्ये लाईन नं.३ मध्ये जमीन ही या शब्दापुढे <u>वादी</u> हा शब्द नमुद केला गेला आहे, तो शब्द वगळुन त्या जागी <u>प्रतिवादी</u> हा शब्द समाविष्ठ करणे आवश्यक आहे. सबब, सदरची झालेली चुक दुरूस्त करण्यास प्रतिवादीने या अर्जाद्वारे परवानगी मागितली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जावर आपले लेखी म्हणणे दाखल करुन विरोध केला की, प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादींनी यापुर्वीच दि.११.०८.२०२२ रोजी त्यांची लेखी कैफियत व जबाबात दुरुस्ती केलेली असुन त्यांना सदरची चुक त्यावेळी लक्षात आलेली नाही. तसेच प्रस्तुत परिच्छेद क्र.४ मध्ये प्रतिवादींनी ॲडमिशन दिले असुन ते आता त्यांची उणीव भरु पाहत आहेत. सदर अर्जात नमुद कारण संयुक्तीक वाटत नाही व प्रतिवादी जाणीवपुर्वक प्रकरण लांबविण्याच्या उद्देशाने असे

वेळोवेळी दुरुस्तीचे अर्ज दाखल करत आहेत, जे की बेकायदेशीर आहे. करीता सदरचा अर्ज खारीज करण्यात यावा, अशी वादीने विनंती केली.

४. प्रतिवादींचा अर्ज व त्यावरील वादीचे म्हणणे बघितले. अर्ज निर्णित करण्यास माझेसमोर खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले. त्याचे निष्कर्ष मी त्याखाली दिलेल्या कारणमिमांसेसह नोंदविले आहेत.

| अनु क्र. | वादमुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादीने मागणी केलेली प्रस्तावित दुरूस्ती दोन्ही पक्षामधील वाद अंतिमतः निर्णित करण्यास आवश्यक आहे काय? | ..होय |
| २. | प्रतिवादीने मागणी केलेल्या प्रस्तावित दुरूस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये बदल होतो काय ? | ..नाही |
| ३. | काय आदेश? | ..अर्ज मंजुर करणेत येत आहे. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र.१ ते ३ करीता**

५. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दोन्ही पक्षामधील खराखुरा वाद अंतिमतः निर्णित करण्यासाठी न्यायालयास, प्रदान केलेल्या विवेकाधिकारानुसार कोणत्याही वेळी आणि त्यास योग्य वाटेल अशा दावा खर्चविषयक अटीवर किंवा अन्यथा, दाव्यातील कोणत्याही कार्यवाहीमधील कोणताही दोष किंवा चुक सुधारता येईल. लेखी जबाबामध्ये दुरुस्तीस परवानगी देत असताना दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये बदल होणार नाही, तसेच प्रस्तावित दुरुस्ती विरुध्द पक्षास त्रासदायक होणार नाही याची दक्षता न्यायालयाने घेणे आवश्यक असते. थोडक्यात दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये बदल न करणारी व खराखुरा वाद निर्णित करण्यासाठी आवश्यक असलेल्या दुरुस्तीस परवानगी देणे न्यायसंगत होते.

६. वादीने सदरचा दावा हा प्रतिवादींविरुध्द मौजे हिवरा, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद येथील गट न.४५ मधील ७ एकर ३ गुंठे शेतजमीनीची वाटणी होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीने केलेली मागणी पाहता त्यांनी त्यांच्या अर्जात स्पष्टपणे नमुद केले आहे की,

सदरच्या दुरुस्तीमुळे त्यांचे लेखी जबाबाचे कसलेही स्परुप बदलत नाही. तसेच लेखी जबाबामधील परिच्छेद क्र.१६ मध्ये दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.१ रामजी याची स्वयंसंपादीत असल्याचा उल्लेख आहे. तसेच प्रतिवादी यांनी आणलेली दुरुस्ती ही नजरचुकीने व टंकलेखनातील चुकीने झालेली आहे असे दिसते. सदरची चुक ही तांत्रिक स्वरुपाची आहे. त्यामुळे ती दुरुस्त करणे आवश्यक आहे. प्रतिवादी प्रस्तावित दुरूस्तीच्याद्वारे केवळ वादी ह्या शब्दाच्या जागेवर प्रतिवादी हा शब्द दुरूस्त करुन मागत आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपावर कोणताही परिणाम होणार नाही. तसेच सदरची दुरूस्ती दोन्ही पक्षामधील वाद अंतिमतः निर्णित करण्यास आवश्यक आहे. लेखी जबाब दाखल करतेवेळी प्रतिवादीने चुकीने प्रतिवादी ऐवजी वादी हा शब्द नमुद केले असल्याचे दिसुन येत आहे. तथापी प्रतिवादीच्या चुकीमुळे न्यायालयाचा बहुमुल्य वेळ वाया गेला आहे. सबब, त्याचेवर उचित खर्च आकारुन अर्ज मंजुर करणे न्यायसंगत होणार आहे, या निष्कर्षापर्यंत मी पोहोचले आहे. करीता, मी मुद्दा क्र.१ चा 'होकारार्थी' व मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदवुन मुद्दा क्र.३ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादीवर रक्कम रुपये २००/– (अक्षरी रुपये दोनशे मात्र) इतका खर्च आकारुन अर्ज मंजुर करण्यात येत आहे.
२. प्रतिवादीने खर्चाची रक्कम वादीला द्यावी.
३. प्रतिवादीला असे आदेशीत करण्यात येते की, त्याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ मध्ये दिलेल्या तरतुदीस अधीन राहून त्याच्या लेखी जबाबामध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत आज पासुन १४ दिवसाचे आत अभिलेखावर सादर करावी.
४. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VRUSHALI VIJAYKUMAR RAOJADEJA
Date: 2023.03.20 16:45:22 +0530

दिनांक :– १६.०३.२०२३

(व्ही. व्ही. रावजडेजा),
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
फुलंब्री.

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करतो की, या पी. डी. एफ. करुन अपलोड केलेल्या आदेशामधील शब्द–नि–शब्द हे मूळ आदेशाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : श्री. युवराज भगवानसिंग मिरधे, |
| न्यायालयाचे नाव | : दिवाणी न्यायाधीश क. स्तर, फुलंब्री |
| आदेशाची तारीख | : १६.०३.२०२३ |
| आदेशावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : १६.०३.२०२३ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | : २०.०३.२०२३ |